जा. क्र.
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-४११ ०११ यांचे
कार्यालय.
दिनांक :- / / .

1 FEB 1993

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे.

विषय :- इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करणेबाबत.
विद्या विकास मंदीर ता. शिरुर जि. पुणे

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक - शिक्षण/माध्य/ह-४/९२-९३
दिनांक- २०/१/९३

उपरोक्त विषयाधीन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, १९८३-८ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासन पत्र क्र. एसएसएन/१०८५/२३४८५[२४४-एन] माशि-१, दि. २९.१.८६ व दि. २०.१२.८८ च्या शासनादेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधीन राहून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर इ. ५ वी ~~ते ७ वी~~ च्या वर्गांना जून, १९९२ या शैक्षणिक वर्षापासून विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी - १] इ. ५ वी ~~ते ७ वी~~च्या वर्गाची परवानगी ही विना अनुदान तत्वावर राहिल.

२] मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३] तसेच वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे तसेच आपण सदर शाळेस १५ दिवसाचे आत भेट देऊन इ. ५ वी ~~ते ७ वी~~ च्या सध्या सुरु असलेल्या वर्गांची तपासणी करावी व तपासणी अहवाल व आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास कळवावा.

मा. शिउसं यांच्या मान्य टिप्पणीनुसार

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत :- १] मा. अवर सचिव, [illegible] विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांना सविनय सादर.

२] मुख्याध्यापक ~~विद्या विकास मंदीर करंदी ता. शिरुर जि. पुणे.~~

दाखल
२६/११/९३

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ड-४/९३-९४
पुणे. दि. २६/११/९३

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

विद्या विकास मंदीर, करंदी.
ता. शिरूर

विषय :- नैसर्गिक वाढीने इ. ६ वी, ~~९ वी, १० वी~~ वर्गास परवानगी व वार्षिक तपासणीबाबत.

आपल्या विद्या विकास मंदीर, करंदी ~~संस्था संचालित~~ ता. शिरूर येथील माध्यमिक विद्यालयातील इ. ५ वी चे वर्गास [माध्यम मराठी/~~इंग्रजी~~] सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून शासन आदेश क्र. ~~एस.एस.एन~~/माध्य २/५वी ते ७वी/पुवि/९२ दि. ३/२/९३ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, ~~इ. १० वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरू होत असून सदर वर्गाची सन ९३-९४ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक तपासणी करणेबाबत ~~उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे~~ /गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिरूर यांना या कार्यालयाकडून कळविण्यात आलेले आहे. तरी आपण आपल्या विद्यालयातील इ. ६ वी, ~~इ. १० वी~~ च्या वर्गाची वार्षिक तपासणी करून घेणेबाबत संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व त्वरित पूर्तता करून घ्यावी. वेळेत वार्षिक तपासणी होवून तपासणी अहवाल या कार्यालयास प्राप्त न झाल्यास सर्वस्वी आपणास जबाबदार समजण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

[illegible]
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

(e)

प्रति

मुख्याध्यापक,

विद्या-विकास मंदिर

करंदी ता. शिरूर, जि. पुणे

पुणे जिल्हा परिषद
शिक्षण विभाग
जा. क्र. शिक्षण/मा/ [illegible]
पुणे ११ दि. ३/१/९४

विषय :- इ. ५वी ते ८वीचे वर्गांना (तुकड्यांना) अनुदान तत्वावर मान्यता देणे बाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे ४ यांचे क्र. माशि-३/अनुदान/मुवि/९३ दि. १३/१२/९३ चे पत्र.

प्रस्तुत विषयांस अनुसरून कळविण्यात येते की आपल्या विद्यालयांचे इ. ५वी ते ८वी चे दोन वर्गांना (तुकड्यांना) वरील संदर्भीय पत्रान्वये अनुसरून जून ९३ पासून अनुदान तत्वावर मान्यता देण्यात येत आहे.

[signature]

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत :- आधिक्षक वेतन पथक (शिक्षण खाते) पुणे-५ यांना माहितीसाठी.

(९०)

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९४-९५
पुणे. दि. २५।६।९४

**BOOK-POST**

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

विद्या विकास मंदीर करंदी

ता. शिरुर.

विषय :- नैसर्गिक वाढीने ~~९, वी~~, १० वी.वर्गास परवानगी व वार्षिक तपासणीबाबत.

आपल्या विद्या विकास मंदीर करंदी ~~संस्था संचलित~~ शिरुर येथील माध्यमिक विद्यालयातील इ. ५ वी चे वर्गास [माध्यम मराठी/इंग्रजी] सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून ~~शिक्षण~~ उपसंचालक पुणे आदेश क्र. ~~स.सु.स.~~/माध्य २/५ वी ते ७ वी/पुवि/१२ दि. ७।२।९२ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासूनआ आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ९ वी~~, इ. १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गाची सन ९४-९५ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक तपासणी करणेबाबत ~~उपशिक्षणाधिकारी~~, ~~जि. प. पुणे~~ /गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिरुर यांना या कार्यालयाकडून कळविणेत आलेले आहे. तरी आपण आपल्या विद्यालयातील ~~इ. ९ वी~~, इ. १० वी च्या वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेबाबत संबंधित अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व त्वरित पूर्तता करुन घ्यावी. वेळेत वार्षिक तपासणी होवून तपासणी अहवाल या कार्यालयास प्राप्त न झाल्यास सर्वस्वी आपणास जबाबदार समजणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

दाखल. २१।३।९६

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद, पुणे विभाग
जा.क्र. शिक्षण/माध्य/जातु/९५-९६
पुणे-१ दिनांक १२/३/१९९६

प्रती,
मुख्याध्यापक,
विद्या विकास मंदिर
करंदी ता. शिरूर

विषय:- मान्यता प्राप्त अशासकीय माध्यमिक शाळांना जादा तुकड्या मंजूर करणेबाबत सन ९५-९६

संदर्भ:- मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे जा.क्र.माध्य./२/तुमा/पुवि ९ दि.११/३/९६

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये पुणे जिल्ह्यातील ज्या शाळांतील इ.५वी ६ वी, ८वी, ९ वी १० वी वर्ग अनुदानीत आहेत व केवळ ७वी चा वर्ग विनाअनुदानीत आहेत अशा शाळांपैकी एकूण ७ शाळांची इ.७वीची प्रत्येकी १ तुकडी सन ९५-९६ शैक्षणिक वर्षापासून अनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | इयत्ता | विना अनुदानित तुकडी | निर्णय |
|---|---|---|---|---|
| १) | सद्गुरु कृपय माध्य. विद्या. नागरगांव, ता. शिरुर | ७ वी | १ | ७वीची १ली अनुदानीत |
| २) | श्री दत्त विद्यालय पिंपरखेड, ता. शिरुर | ७वी | १ | ७वीची १ली अनुदानीत |
| ३) | श्री छत्रपती हायस्कूल, अंथुर्णे, ता. इंदापूर. | ७वी | १ | ७वीची १ली अनुदानीत |
| ४) | नवखंड माध्य. विद्या. पारगांवतर्फे, खेड, ता. अंबेगांव | ७वी | १ | ७वीची १ली तुकडी अनुदानित |
| ५) | भैरवनाथ विद्यालय, पारगांव, शिंगवे, ता. आंबेगाव | | १ | --,-- |
| ६) | श्री. रेऊबाई बाळाजी देवकर माध्य. विद्या. वडगांवआनंद, ता. जुन्नर. | ७वी | १ | --,,-- |
| ७) | विद्या विकास मंदीर करंदी, ता. शिरुर. | ७वी | १ | --,,-- |

२) अशासकीय मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना खालीलप्रमाणे सन १९९५-९६ या शै. वर्षापासून जादा तुकड्या अनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | इयत्ता | मान्य तुकड्या | जादा तुकडी मागणी निर्णय |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. भैरवनाथ विद्यालय भोसरी | ७वी | ४ | ७वीची ५वी मान्य |
| | | ९वी | ६ | ९वीची ७ वी |
| | | १०वी | ५ | १०वीची ६ वी मान्य |
| २) | सरस्वती विद्यालय आकुर्डी पुणे-४४ | ८वी | ४ | ८वीची ५वी मान्य |

पाठीमागे..

(92)

| | | | |
|---|---|---|---|
| ) नागेश्वर विदयालय, पाटस ता. दौंड | ७वी | ३ | ७वीची ४ थी मान्य |
| ) नुतन प्रशाला त्रिवेणीनगर तळवडे - पुणे - | ५वी | १ | ५वीची २री मंजूर |
| | ६वी | १ | ६वीची २री मान्य |
| ) वाघेश्वर विदयालय निरावागज, ता. बारामती. | ६वी | १ | ६वीची २री मंजूर |
| ) शिरसाई विदयालय शिर्सुफळ, ता. बारामती. | ७वी | १ | ७वीची २री मंजूर |
| ) आगरकर हायस्कूल, मुलींचे पुणे-११. | १०वी | ४ | १०वीची ५वी मंजूर. |

---

उपरोक्त मंजूर केलेल्या तुकड्यानुसार त्वरीत सेवक संच निश्चिती करून घ्यावी व तसा अहवाल हया कार्यालयास तात्काळ सादर करणेत यावा.

[illegible]

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत:-

१) अधिक्षक, वेतन पथक पुणे-१ हयांना पुढील कार्यवाहीसाठी सदरचा खर्च ३१ मार्च पूर्वी होईल असे पहावे.

२) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-१

३) मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे-१.

F१०३

फोन नं. ६३७७४१.

" यशवंतराव चव्हाण भवन "
पुणे जिल्हा परिषद पुणे.
जा. क्रं. शिक्षण. माध्य. नवीन नैसर्गिक/जादा/तुकडया
मंजुरी ९८.९९------- दिनांक २१.११.९८.
१८१०

(९७)

बुक पोष्ट

प्रती,
मुख्याधापक/ मुख्याध्यापिका
विद्याविकास मंदिर करंदी ---------------- ता. शिरूर जि. पुणे
पुणे शहर पिन नं. ----------------

विषय :- नविन तुकडया मान्यता नंतर करावयांच्या सेवक निश्चिती बाबत.

संदर्भ :- मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कडील पत्र जा. क्रं. मान्य. जातु. पुवि. ९८ दिनांक १९.११.९८.

उपरोक्त विषय व संदर्भानिवये आपणांस कळविणेत येते की, शैक्षणिक वर्षे सन ९८-९९ मध्ये विद्यार्थी संख्या वाढीमुळे आपल्या शाळेतील खालील दर्शविलेल्या प्रमाणे तुकडी मान्य करण्यांत आली आहे.

| इयत्ता | पट संख्या | शहरी ग्रामीण | सध्या मंजुर तुकडया | जादा तुकडी मागणी | जादा तुकडीतील वि. स. | प्रत्येक तुकडीतील अधिक वि: प्रमाणे. | ~~नैसर्गिक~~/जादा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ वी | ६४ | ग्रा | १ | २री | १४ | १४ | जादा |
| ९ वी | | | | | | | |
| १० वी | | | | | | | |

सदरची तुकडी / तुकडया वाढल्याने निर्माण होणाऱ्या पदाबाबंत सेवक निश्चती करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी जिल्ह्यांतील ज्या शाळांना नवीन तुकडया मंजुर करण्यांत आलेल्या आहे. त्या शाळांची सेवक निश्चीती शिबीर वेळापत्रकानुसार राहिल,

| | विभाग | दिनांक | स्थळ | वेळ |
|---|---|---|---|---|
| १] | पुणे शहर/पिंपरी चिंचवड मावळ, मुळशी, भोर, वेल्हे, | १.१२.९८ | न्यु इंग्लिश स्कुल रमणबाग पुणे ३० | ११.०० ते ५.३० |
| २] | खेड, जुन्नर, आंबेगाव, शिरुर | २.१२.९८ | --"--"--"------"- | --"- |
| ३] | दौंड, बारामती, इंदापुर हवेली, पुरंदर | ३.१२.९८ | --"---"---"-------- | --"--- |

या कार्यालयाचे पत्र जा. क्रं. माध्य. सेनिमा. ९७.९८ दिनांक १७.७.९८ व सन ९८.९९ अन्वेय सेवक निश्चीती साठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रासह सेवक निश्चतीचा प्रस्ताव मुख्याधापकाने स्वता: मान्यतेसाठी वरील वेळापत्रका प्रमाणे मान्य करुन घ्यावा. सदर शिबिरांस उपस्थित न राहिल्यांस सेवक निश्चिती व वैयक्तिक मान्यता या कार्यालयांकडुन केली जाणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी [ माध्य. ]
पुणे जिल्हा परिषद पुणे.

स्थळ प्रतीवर मा. शि. अ.
जि. प. पुणे यांची सही आहे

(९४)

९०

जा.क्र. माध्य-३/93/मा.तु/९८-९९/पुवि/९८
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 19 NOV 1998

प्रति,

मुख्याध्यापक,
विद्या विकास मंदिर करंदी
ता. शिरूर.

विषय :- अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळेतील जादा मंजूर केलेल्या तुकड्यांबाबत..
सन १९९८-९९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, सन ९८-९९ या शैक्षणिक वर्षात आपल्या शाळेची पट पडताळणी केली असता इयत्ता ८वी या वर्गाच्या २री जादा तुकडीस मंजुरी देण्यात येत आहे. तसे आदेश शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांना अग्रेषित देण्यात आलेले आहेत. तरी आपण शिक्षण अधिकारी यांच्याशी हे पत्र मिळाले पासून चार दिवसांच्या आत संपर्क साधावा. व आपल्या शाळेचा शिक्षक/शिक्षकेतर संच सुधारित रित्या मंजूर करून घ्यावा. या तुकडयावर नवीन शिक्षक नेमण्यात येवू नयेत. खात्याकडून अतिरिक्त शिक्षक पाठविण्यात येईल. सदर शिक्षकास हजर करून घेणे बंधनकारक आहे. नवीन शिक्षक नेमण्यापूर्वी शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद पुणे यांची मान्यता घेऊनच नेमणूक करावी. याबाबत आपल्या संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचेशी संपर्क साधून सदर बाब त्यांच्या निदर्शनास आणावी.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१ करिता.

**पुणे जिल्हा परिषद,पुणे.**
यशवंतराव चव्हाण भवन.
शिक्षण विभाग (माध्यमिक).
जा.क्र. शिक्षण/माध्य/तु.ट.अ./१४५१/०६.
पुणे.दिनांक ०७/१२/२००६.

प्रति,

**मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,**
विद्या विकास मंदिर
जिल्हा पुणे करंदी ता.शिरूर

**विषय :- इयत्ता ५ वी ते इ.७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी च्या विना अनुदान तत्वावरील वर्गास/ तुकडीस पुढील टप्पा अनुदान मंजूर करणेबाबत...**

**संदर्भ -**
1. **शालेय शिक्षण विभाग निर्णय क्र माशाअ/१८०६/४४०/२००६ माशि-१ दिनांक १४.०९.२००६**
2. **शालेय शिक्षण विभाग निर्णय क्र माशाअ/१८०६/४४०२००६ माशि-१ दिनांक ०३.१०.२००६**
3. **मा.शिक्षण उपसंचालक(माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे १ यांचेकडील पत्र क्र.अमाशा/जातु/ अनु./७०३५६ १५क /५८७४८-८७० दिनांक ०५.१०.२००६.**

उपरोक्त विषयी संदर्भी पत्र क्र १ व २ अन्वये आपल्या विद्या विकास मंदिर करंदी पुणे या माध्यमिक शाळेस जोडलेल्या इयत्ता ५ ते १० च्या वर्ग / तुकडयाना वेतन व वेतनेत्तर खर्चाच्या विना अनुदान तत्वावर असलेल्या खलीलप्रमाणे वेतनअनुदान मंजूर करणेत आलेले आहे.

सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत कार्यरत असलेल्या शिक्ष / शिक्षकेतर कर्मचा-यांची वैयडतीक मान्यता या कार्यालयाकडून घेऊनच माहे डिसेंबर २००६ ते माहे फेब्रुवारी २००७ अखेरचे वेतन अदा करणस परवानगर देणेत येत आहे.

| **मान्यता मिळालेले शैक्षणिक वर्ष** | टप्पा | इ.५ वी | इ ६ वी | इ ७ वी | इयत्ता ८ वी | इ ९ वी | इ १० वी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००१-०२ | अनुदान | — | | — | | २०% / ४०% | [illegible] |

**शिक्षणाधिकार (माध्यमिक),**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे.**

प्रत: -अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

अपेक्षा

दा. नं.
20/9/2008

यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे
[ शिक्षण माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/ई-३/०४-०५
दिनांक : २-९-२००४.

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका, BOOK-POST
---विद्या विकास मंदिर---
---करंदी---
---ता. शिरुर जि. पुणे---

विषय :- मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकड्या मंजूर करणे बाबत......

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा. शा. अ-१००३/[३८०/२००३] मा. शि.-१ दिनांक १३ ऑगस्ट २००४.

२] मा. शिक्षण संचालक [माध्य. व उच्च माध्यमिक] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा १००४/ /२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ०८.०९.२००४ चे पत्र

~~३] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक दिनांक~~

~~चे पत्र.~~

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन २००१-०२ २००२-०३ व २००३-०४ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यास आलेली ~~पटपडताळणी~~ व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयास पुढील प्रमाणे नविन तुकड्या त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यास येत आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा / नैसर्गिक. वाढीव | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | ९वी | २री | २००१/०२ | नैसर्गिक वाढीने | विनाअनुदानित |
| २. | १० वी | २री | २००३/०४ | जादा प्रवेश | कायम विना अनुदानित |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |

उपरोक्त तुकडया पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकडयांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्र किंवा जेव्हा त्या तुकडया अनुदानास पात्र ठरून अनुदानावर आणल्या जातील त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकडयांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी-प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकडयांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अति - रिक्त तुकडया या केवळ कायम विनाअनुदान-तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकडया अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

४] कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकडया कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यास आल्या आहेत अशा तुकडया देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकड्यानुसार सेवकसंच मान्य करुन घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करुन द्यावी.

शिक्षणाधिकारी [माध्य.]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

स्थळ प्रतिवर मा. शि. अ. (माध्य.)
यांची स्वाक्षरी असे.

वाचा - १) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील निर्णय क्रमांक माशातु-२०१२/(९०/१२) / माशि-१ दिनांक १६ ऑगस्ट २०१२.

२) शासन निर्णय क्र.माशातु-२०१०/(४२०/१०) /माशि-१ दिनांक १४/६/२०१०.

३) मा.शिक्षण संचालक माध्य.व उच्च माध्य.शिक्षण संचालनाय पुणे यांचेकडील पत्र क्र.अमाशा/२०१२-१३/अतिरिक्त तुकडया/१५ क(०६)/ ८०८५ दिनांक २१/८/२०१२.

४) मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र.शिउसं/माध्य-३/१३/२२०७५/७९/ अतिरिक्त तुकडया/पुवि/१२ दिनांक ५/९/२०१२.

५) आपलेकडील सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ चे पटपडताळणी अहवाल तसेच सदर वर्षाचे अतिरिक्त तुकडी मागणी प्रस्ताव.

६) कार्यालयीन मान्य टिपणी दिनांक १०/०९/२०१२.

---

**पुणे जिल्हा परिषद पुणे.**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**माध्यमिक शिक्षण विभाग**
**जा.क्र.जिप/माध्य/अतितु/शिबीर/१२**
**पुणे दिनांक १७/१०/२०१२.**

## विना अनुदान तुकडी मंजुरी आदेश –

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित / विना अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या वर्गांना नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडयांना **सन २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर** मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर यादीनुसार आपल्या शाळेस खालील अटीस अधीन राहुन शहरी व ग्रामीण विभागातील शाळांतील **अतिरिक्त तुकडयांस शैक्षणीक वर्ष २०१२-१३ पासून विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.**

| अ.नं | शाळेचे नाव | इयत्तानिहाय तुकडयांची संख्या | | | | | | एकूण तुकडया |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९ वी | १० वी | |
| | | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | तुकडी क्र | |
| १ | विदयाविकास मंदीर करंदी ता.शिरुर जि.पुणे | ------- | ------- | २ | ------- | ------- | ------- | १ |
| | | ------- | ------- | २ री | ------- | ------- | ------- | |

१) इ.५ वी ते ८ वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

२) इ.९ वी व १० वीच्या अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकडया सुरु करताना शाळेमध्ये माध्यमिक शाळा संहिता कलम ८.३ (एक) नुसार भौतिक / शैक्षणिक सुविधांबाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३) प्रत्यक्षात निकषानुसार आवश्यक विदयार्थी पटसंख्या कमी आढळल्यास सदरचे तुकडी मंजूरीचे आदेश आपोआप रद्द होतील.

४) सदरच्या मंजूर केलेल्या तुकडयांना भविष्यात लागू होणा-या अनुदान सूत्रानुसार किंवा सदयस्थितीत लागू असलेल्या दिनांक १५ नोव्हेंबर २०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या वर्षी मूल्यांकनात पात्र ठरतील त्या वर्षापासून म्हणजेच पाचव्या वर्षी २० टक्के, त्यापुढील वर्षी अनुक्रमे ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के या प्रमाणात सदर तुकडया अनुदानास पात्र होतील. अनुदानास तुकडी पात्र झाली म्हणजे त्या तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित तुकडयांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार असून निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र तुकडयांना अनुदान लागू करेल.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रति,

मुख्याध्यापक संबंधित शाळा - विदयाविकास मंदीर करंदी ता.शिरुर जि.पुणे
२/- सदर आदेशानुसार आपण सन २०१२-१३ ची सेवकसंच निश्चिती करुन घ्यावी.

प्रत माहितीसाठी सादर –

१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-०१.

२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-०१

३) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे-०१.

**वाचा** - १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक माशाअ-२००९/(५९९/०९) माशि-१ दि.२० जुलै २००९.
२) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक माशाअ-२००९/(५९९/०९) माशि-१ दि.१५ नोव्हें २०११.
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक संकीर्ण-२०१२ (१५०/१२) माशि-१ दि.१६ जुलै २०१३.
४) शासन निर्णय क्रमांक माशामु- २०१६/(११/१६)/२०१६एसएम-४ दिनांक १ जुलै २०१६.

---

पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.जिप/माध्य/शावतु/अनुघो/१६/ 8984
पुणे दिनांक 31/०७/२०१६

**आदेश** --

उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ व ३ चे शासन निर्णय तसेच संदर्भ क्र. ४ नुसार पुणे जिल्हयातील अनुदानास पात्र ठरलेल्या माध्यमिक शाळांतील विनाअनुदानित जादा तुकडया / ५ वी ते ७ वीचे प्रथम वर्ग अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेले आहेत. यामधील अनुदानासाठी विहित केलेले निकष मुल्यांकन पध्दती पुर्ण करीत असलेल्या शाळेतील वर्गांना त्यांच्या नावासमोर नमूद केल्यानुसार खालीलप्रमाणे पदे शासन निर्णयातील खालील अटी व शर्तींच्या अधीन राहुन अनुदानास पात्र घोषित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संस्थचे व शाळेचे नाव | माध्यम | तुकडी / वर्ग | क्षेत्र | अनुदानास पात्र ठरलेली पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रशिक्षीत अपदवीधर | प्रशिक्षीत पदवीधर | एकुण पदे |
| १ | श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळाचे विदया विकास मंदिर, करंदी ता.शिरुर जि.पुणे. | मराठी | इ. १० वी ची दुसरी तुकडी | बिगर आदिवासी | ०० | ०१ | ०१ |

**अटी व शर्ती** -

१) प्रपत्र-अ आणि प्रपत्र -ब मध्ये नमूद केलेल्या शाळांनी शासन निर्णय दि.१५ नोव्हेंबर २०११ व दिनांक १६ जुलै २०१३ मधील सर्व निकष व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२) सर्व शाळांचे जिल्हा शैक्षणिक प्रणालीवरील (यु-डायस) क्रमांक आणि शाळेत शिकत असलेल्या विदयार्थ्यांच्या आधारकार्ड क्रमांकाच्या आधारे विदयार्थी संख्या ग्राहय धरण्यात येईल.

३) शाळेमधील सर्व शिक्षकांच्या आधारकार्डची यादी व वैयक्तिक मान्यतेचे आदेश सरल प्रणालीत भरल्याशिवाय कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. विदयार्थ्यांच्या आधारकार्डवर आधारीत विदयार्थी संख्येनुसार शिक्षक पदे देय राहतील.

४) शासनाच्या प्रचलित नियमानुसार सर्व शाळांनी मूलभूत सुविधांबाबतची पूर्तता करणे बंधनकारक राहील. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार Non Performing / Under Performing / Non Complaince शाळा विहित पध्दतीने बंद करणे अपेक्षीत असल्याने, शाळा, वर्ग/ तुकडया अनुदानास पात्र ठरल्या असल्या तरी, त्यांनी वरील निकषांची पूर्तता करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

५) सदर आदेशान्वये शाळा / तुकडया मूल्यांकनात पात्र म्हणुन घोषित करण्यात आली असली तरी त्यास अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. संबंधित शाळांना अनुदान लागू करणे हा शासनाचा स्वेच्छाधिकार आहे. सदर अनुदानपात्र शाळांना जेंव्हा अनुदान सुरु करावयाचे असले त्या वेळेचे अनुदान सूत्र त्यांना लागू राहील व ते निधीच्या उपलब्धतेनुसार अदा केले जाईल. सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने लागु होणार नाही किंवा निधी उपलब्ध होईपर्यंतचा फरक अनुज्ञेय असणार नाही. ज्यावेळी अनुदान मंजूर होईल त्या शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेनुसार मंजूर असलेल्या पदांनाच सदर अनुदान अनुज्ञेय राहील.

६) ज्या शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विदयार्थी पटसंख्या ३० पेक्षा कमी असेल तसेच डोंगराळ व दुर्गम भागातील शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विदयार्थी पटसंख्या २० पेक्षा कमी असेल, परंतू शाळेतील एकूण विदयार्थी संख्या २० पेक्षा अधिक असेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही व त्या शाळा स्वयं-अर्थसहाय्यित शाळा समजण्यात येतील.

७) ज्या शाळांमध्ये शेवटच्या वर्गात विदयार्थी पटसंख्या ३० पेक्षा कमी असेल परंतु, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक २८ ऑगस्ट २०१५ मधील तरतूदीनुसार कमी पटसंख्येच्या कारणाने बंद करण्याच्या निकषापेक्षा अधिक विदयार्थी संख्या असेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. अशा शाळा स्वयं-अर्थसहाय्यित शाळा समजण्यात येतील.

८) ज्या शाळेतील शेवटच्या वर्गातील विदयार्थी पटसंख्या ३० पेक्षा जास्त असेल व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पद भरती संदर्भात आरक्षण धोरणाचे पालन केलेले नसेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही व अशा शाळा स्वयं-अर्थसहाय्यित शाळा समजण्यात येतील.

९) शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट २०१५ मधील तरतूदीनुसार ज्या शाळांमध्ये विदयार्थी पटसंख्या कमी असेल अशा शाळा बंद करण्यात याव्यात व त्या शाळांमधील विदयार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करण्यात यावे, मात्र अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय होणार नाही.

१०) वरीलप्रमाणे शाळा बंद होण्यापूर्वी सदर शाळेस अनुदान सुरु झाले असल्यास त्या शाळेतील शिक्षकांना शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे इतर शाळांमध्ये समायोजित करण्यात येईल.

११) शासकीय/ खाजगी अनुदानित शाळेत अतिरिक्त ठरलेले शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी सदरहू शाळांना सामावून घेणे बंधनकारक राहील. सदरहू शाळांमधील शिक्षक भरती सेवाप्रवेश विषयक प्रचलित नियमानुसार करणे बंधनकारक राहील.

१२) अनुदानाचा पुढील टप्पा केव्हा लागू करावा याबाबत संभ्रम राहू नये व राज्यात सर्व जिल्हयात याबाबत अंमलबजावणीत एकवाक्यता राहावी म्हणून स्पष्ट करण्यात येते की, शासन वेळोवेळी उपलब्ध होणारी आर्थिक संसाधने व राज्याच्या गरजा व त्यांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन अनुदानाचा पुढील टप्पा केंव्हा लागू करायचा किंवा लागू करायचा की नाही याबाबत त्यावेळेची आर्थिक संसाधने, आर्थिक स्थिती तपासून निर्णय घेईल.

१३) शासनाचा स्वेच्छाधिकार :- अनुदानासाठी शाळा पात्र झाली म्हणजे त्या शाळेस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित शाळांना अनुदान लागू करणे हा शासनाचा **स्वेच्छाधिकार** असुन निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र शाळांना अनुदान लागू करील. सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने लागू केले जाणार नाही. तसेच, शाळांना विना अनुदान तत्वावर कोणत्याही शैक्षणिक वर्षात मान्यता दिलेली असली तरी, शासन वेळोवेळी उपलब्ध होणारी आर्थिक संसाधने व राज्याच्या गरजा व त्यांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन अनुदानाच्या सुत्रात बदल करील व ज्या शाळांना अनुदान सुरु करण्यात आलेले नाही, त्या शाळांना जेव्हा अनुदान सुरु करावयाचे असेल त्यावेळेचे अनुदान सूत्र त्यांना लागू राहील.

**( हरुन आतार )**
शिक्षणाधिकारी (माध्य)
पुणे जिल्हा परिषद पुणे

प्रति, अध्यक्ष / सचिव / मुख्याध्यापक,
श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळाचे विदया विकास मंदिर, करंदी ता.शिरुर जि.पुणे.

**प्रत माहिती व कार्यवाहीस सादर - -**

१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-०१
२) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे-०१
३) अधीक्षक, माध्यमिक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक पुणे-१.